# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pr&o.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट ३४-२३** **दिनांक ३१/०१/२०२३**

## खुनाच्या गुन्हयाची ४ तासात उकल- गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा यांची कामगिरी.

दिनांक ३०/१/२०२३ रोजी १८.३० वाजण्याचे सुमारास सिध्दीविनायक गॅरेज समोर, जांगीड सर्कल जवळ, एम.टी.एन.एल.रोड, मिरारोड पूर्व येथे तीन ते चार अज्ञात इसमांनी अंकुश राजेशकुमार राज, वय-२० वर्षे, रा. १०३, सी-विंग, क्विन्सपार्क, शक्ती टॉवर मिरारोड पूर्व याचे छातीवर कोणत्यातरी हत्याराने गंभीर दुखापती करुन जीवे ठार मारलेबाबत त्याची आई फिर्यादी श्रीमती रुपादेवी राजेशकुमार राज यांनी दिलेल्या तक्रारीवरुन मिरारोड पोलीस ठाणेत गुन्हा रजि.नंबर ३७/२०२३ भा.दं.वि.सं.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंद करणेत आला होता.

सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेउन वारिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष १, काशिमीरा हे करीत होते. गुन्हे शाखा कक्ष ०१ काशिमीरा चे अधिकारी व अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने आरोपीत नामे १) आयुष भानुप्रसाद सिंग, वय-१९ वर्षे, २) आकीब खालीद अन्सारी वय-२० वर्षे, ३) शेख फरहान नजरे आलम, वय-१८ वर्षे, ४) अरमान हबीब लदाफ, वय-१८ वर्षे, व ५) हैदर पैंगबर पठाण, वय-१८ वर्षे ६) अशपाक अख्तर मंसुर, वय २५ वर्षे, ७) मेहताब रहीमुद्दीन खान, व २२ वर्षे, ८) अमित सौरव सिंग, वय २२ वर्षे, ९) सरवरहुसैन शफीकउल्ला खान यांस ताब्यात घेऊन विचारणा केली असता मयत याचा मामा हर्ष राज व आरोपी आयुष भानुप्रताप सिंग याचेमध्ये वाद झाले होते त्यावेळी मृतक अंकुश राजेशकुमार राज याने त्यांची भांडणे सोडवल्याचा राग मनात धरुन अटक आरोपीत यांनी आपापसात संगनमत करुन सदर गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

सदरची कामगीरी श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा कक्ष १ काशिमीराचे पो.नि. अविराज कुराडे, स.पो.निरी कैलास टोकले, राजु तांबे, संजय पाटील, पो.हवा. विनोद राऊत, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, अविनाश गर्जे, विजय गायकवाड, सचिन सावंत, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पो.अंम. प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी व सफौ. संतोष चव्हाण, नेम. सायबर गुन्हे शाखा यांनी केली आहे.

----ooo----